**भूतानच्या परराष्ट्र सचिवांची भारत भेट**

29 सप्टेंबर 2025

परराष्ट्र सचिव श्री. विक्रम मिसरी यांनी आज भूतानचे परराष्ट्र सचिव ओम पेमा चोडेन यांच्याशी सल्लामसलत केली.

2. परराष्ट्र सचिवांनी द्विपक्षीय सहभागाच्या संपूर्ण विस्ताराने आढावा घेतला. सहकार्याच्या सर्व प्रमुख क्षेत्रांमध्ये प्राप्त प्रगतीची नोंद घेतली. विशेषतः त्यांनी 1020 मेगावॅट पुनत्सांगछू-II जलविद्युत प्रकल्पाच्या सर्व सहा युनिट्सच्या यशस्वी कार्यान्विततेचे स्वागत केले. हा प्रकल्प भारत-भूतान संयुक्त ऊर्जा भागीदारीच्या दृष्टीकोनातून महत्वाचा टप्पा मानला जातो.

3. भूतानच्या 13 व्या पंचवार्षिक योजनेअंतर्गत भारत सरकारच्या पाठिंब्याने सुरू असलेल्या विकास सहकार्य प्रकल्प आणि उपक्रमांबद्दल त्यांनी समाधान व्यक्त केले. प्रकल्प योग्य दिशेने कार्यान्वित असून भूतानच्या नागरिकांना प्रत्यक्ष लाभ मिळत आहेत.

4. या भेटीदरम्यान, भारत आणि भूतान दरम्यान रेल्वे जाळे विस्तारण्यासाठी आंतर-सरकारी सामंजस्य करारावर स्वाक्षरी करण्यात आली. या सामंजस्य करारात कोक्राझार आणि गेलेफू आणि बनारहाट आणि समत्से यांना जोडणाऱ्या पहिल्या सीमापार रेल्वे लिंकची स्थापना करण्याची योजना आहे. हे प्रकल्प उभय देशांमधील संपर्क विस्ताराच्या व्यापक प्रयत्नांचा भाग आहेत. ज्यामुळे वित्तीय आणि नागरिक परस्पर संबंध अधिक दृढ होतील.

**नवी दिल्ली**

29 सप्टेंबर 2025